**प्रेस नोट १६/०७/२०१९**
**शिवाजीनगर पोलीस ठाणे पुणे शहर**
**आग विझवुन जिवीतहानी टाळलेबाबत.**

दि.१५/०७/२०१९ रोजी सकाळी ०८.३० वा चे ललीत महल हॉटेल चौक येथे एका घरामध्ये आग लागली आहे.असा शिवाजीनगर पोलीस स्टेशन कडील मार्शलला कॉल प्राप्त झाल्याने तात्काळ पोशि शेख व पोशि कर्चे सदर ठिकाणी पोहचले असता. श्री.निरंजन रविंद्र जोशी रा.ललीत महल हॉटेल चौक शिवाजीनगर पुणे यांचे निवासस्थानी त्यांचे आजोबा कपडयांना इस्त्री करीत होते.कपडयांना इस्त्री करुन झाल्यानंतर आजोबांनी गरम इस्त्री चुकुन गादीवर ठेवली.गरम झालेली ईस्त्री गादीवर ठेवल्यामुळे गादी गरम होवुन गादीने पेट घेतला आहे सदर ठिकाणी पोलीस निरीक्षक गुन्हे श्री.बापु शिंदे व मार्शल यांनी तात्काळ घरामध्ये जावुन प्रसंगावधान राखुन आग विझवण्यात आली.त्यामुळे कोणीतीही जीवीतहानी व वित्त हानी होवु दिली नाही.

वरील नमुद कार्यवाही ही श्री.बापु शिंदे पोलीस निरीक्षक,गुन्हे शिवाजीनगर पोलीस ठाणे पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पोशि शेख,पोशि कर्चे व जीवरक्षक राजेश काची यांनी केलेली आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक
शिवाजीनगर पोलीस ठाणे पुणे शहर